**ठळक बातम्या**

- राज्यातल्या विविध धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०२ टीएमसी जास्त पाणीसाठा
- २ लाख ५६ हजार १३७ कोटी रुपयांच्या विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना प्रोत्साहन द्यायला राज्य सरकारची मान्यता
- महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
- बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांत पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान

**आणि**

- साखर कारखाने खरेदी प्रकरणी आमदार रोहित पवार यांच्यासह १७ जण दोषमुक्त

**<><><><><>**

राज्यातल्या विविध धरणांमध्ये सुमारे ६५४ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती आज मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०२ टीएमसी पाणीसाठा जास्त आहे. गेल्या वर्षी हा साठा सुमारे ५५२ टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमततेमुळे पुढच्या वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के, तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती, असं जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करून २ लाख ५६ हजार १३७ कोटी रुपयांच्या विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना प्रोत्साहन द्यायला सरकारनं मान्यता दिली आहे. यामुळे एक लाखांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १४ वी बैठक आज मुंबईत झाली, त्यानंतर ते बोलत होते. या बैठकीत थ्रस्ट सेक्टर तथा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनं, अवकाश आणि संरक्षण साहित्य, लिथियम आयन बैटरी, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती साहित्य, स्टील आणि गॅस टू केमिकल निर्मितीच्या विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या १८ प्रस्तावांना मुख्यमंत्र्यांनी आज मान्यता दिली. या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण २०२६ आज राज्य सरकारने जाहीर केलं. आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हिसी**

*(कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरणामुळे घनकचऱ्याचं पर्यावरणपूरक व्यवस्थापन तसंच हरित गृह वायू उत्सर्जन कमी होण्यास मदत होणार आहे. तसंच शहरांतल्या कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणं शक्य होणार आहे. त्याचबरोबर कचरा साठवण्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या, पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी होईल. यासाठी पाचशे कोटींची तरतूद केली आहे. या धोरणामुळे ऊर्जा आयातीत घट होईल, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन कार्बन उत्सर्जनात घट होईल, तसंच वाहतूक, औद्योगिक आणि घरगुती क्षेत्रासाठी स्वच्छ इंधनाचा पर्याय उपलब्ध होईल.*

*कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार जमिनीचं रुपांतर भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्यासाठीच्या अधिमूल्याची पुनर्रचना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला. याबाबतची अधिसूचना काढण्यासाठी मान्यता*

*देण्यात आली आहे. राज्यातल्या सात आदर्श महाविद्यालयातल्या शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन देण्याचा निर्णयही झाला आहे. तसंच सातारा जिल्ह्यातल्या नागेवाडी इथं आय टी पार्कला ४२ एकर जमीन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे.)*

**<><><><><>**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविषयी उच्चारलेले बदनामीकारक शब्द मागे घ्यावेत आणि माफी मागावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी खरगे यांच्या वक्तव्याचा निषेध केला, काँग्रेस नेहमीच प्रधानमंत्र्यांची बदनामी करते मात्र त्यानंतर जनता त्यांना उत्तर देते असं ते म्हणाले. आण्णा द्रमुक हा पक्ष आण्णा दुराई यांचा वारसा सांगतो मात्र दहशतवादी असलेल्या नरेंद्र मोदी यांच्या पक्षाशी युती करतो असं वक्तव्य खरगे यांनी तमिळनाडूमधे केलं होतं. त्यानंतर माध्यमांनी याबाबत विचारलं असता आपण प्रधानमंत्र्यांना दहशतवादी म्हटलं नसून ते विविध यंत्रणांचा वापर करून विरोधी पक्षांमधे दहशत निर्माण करतात या अर्थी तो शब्द बोलल्याचं स्पष्टीकरण दिलं.

**<><><><><>**

बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांतही पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. राहुरीत एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना सुरक्षित आणि निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी सर्व ३७४ मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सर्व केंद्रांवर 'वेबकास्टिंग' द्वारे थेट लक्ष ठेवले जाणार आहे. यानिवडणुकीत मतदान कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर साहित्यासाठी मुख्यालयात एकत्र येण्याची गरज राहणार नाही. त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवरच थेट साहित्य उपलब्ध करून दिले जाईल आणि मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे साहित्य पुन्हा केंद्रावरूनच गोळा केलं जाणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या साखर कारखाने आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी आमदार रोहित पवार यांच्यासह सर्व १७ आरोपींना विशेष पीएमएलए न्यायालयानं आज दोषमुक्त केलं. आता हे प्रकरण पूर्णपणे निकाली काढलं आहे.

**<><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी ४ संशयितांना मुंबई उच्च न्यायालयानं आज दोषमुक्त केलं आणि त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करायचा विशेष न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरवला. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या पीठानं हा निर्णय दिला. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या चौघांविरुद्ध आरोपपत्र करायचे आदेश विशेष न्यायालयानं दिले होते.

**<><><><>**

इराणसोबतची शस्त्रसंधी अमर्याद काळासाठी वाढवण्यात आल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. इराणसोबत चर्चा करण्यासाठी हे आवश्यक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. इराणसोबतची दोन आठवड्यांची शस्त्रसंधी आज सकाळी संपली, त्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही घोषणा केली आहे. पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाज शरीफ आणि फिल्ड मार्शल असीम मुनीर यांच्या विनंतीवरून आपण हा निर्णय घेतल्याचंही त्यांनी सांगितलं. मात्र अमेरिकन नौदल इराणच्या बंदरावरची नाकेबंदी सुरूच ठेवेल असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गवर मुंबईकडे जाणारी वाहतूक उद्या दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येईल. तर पुण्याकडे जाणारी वाहतूक परवा दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. डोंगरगाव-कुसगाव इथं राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात आलेल्या पुलाचं शटरिंग काढणं आणि रंगकाम करण्याचं काम हाती घेण्यात आलं असल्यानं ही वाहतूक बंद राहणार आहे.

**<><><><><>**

विज्ञान शाखेतल्या पीसीएम आणि पीसीबी गटातल्या विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या प्रयत्नासाठी नोंदणी करण्याची अंतिम मुदत उद्यापर्यंत वाढवण्यात आली आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. विद्यार्थ्यांना उद्या रात्री बारा वाजेपर्यंत cetcell.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर ही नोंदणी करता येईल.

**<><><><><>**

कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती आणि माहिती तंत्रज्ञान कंपन्यांचे समभाग घसरल्याचा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारांमध्ये दिसून आला. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ७५७ अंकांची घसरण झाली आणि तो ७८ हजार ५१६ अंकावर बंद झाला. निफ्टीही १९९ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ३७८ अंकांवर बंद झाला. यामुळे गेल्या ३ सत्रांमध्ये वधारलेल्या देशातल्या शेअर बाजारांच्या तेजीला लगाम लागला.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणी पुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाच्या जलवाहिनीवरच्या तांत्रिक कामासाठी आज रात्री 10 वाजेपर्यंत मुख्य जलवाहिनीवरील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा असं आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे. आजचा संध्याकाळचा पाणी पुरवठा होणार नाही आणि उद्या म्हणजे गुरुवार 23 एप्रिल रोजी सकाळचा आणि संध्याकाळचा पाणी पुरवठा कमी दाबाने होणार आहे याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

**<><><><><>**

हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीत हळदीच्या दरामध्ये व्यापाऱ्यांकडून आर्थिक लूट होत असल्याचं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. आज सकाळी सेनगाव तालुक्यातल्या

गोरेगाव इथल्या माँ जिजाऊ चौकात तीव्र आंदोलन करण्यात आलं. क्रांतिकारी शेतकरी संघटनेनं हे आंदोलन केलं. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी रस्त्यावर हळद पेटवून सरकार आणि बाजार समिती प्रशासनाचा निषेध नोंदवला.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीर मधल्या पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या स्मृती दिनानिमित्त पीडितांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांच्या स्मृती देशाच्या सामूहिक स्मरणात कायम राहतील, असं सांगत त्यांच्या कुटुंबासोबत देश एकजुटीने उभा असल्याचं म्हटलं. तर, प्रधानमंत्री मोदी यांनीही देश दहशतवादापुढे कधीही झुकणार नाही, असा निर्धार व्यक्त करत पीडितांना कधीही विसरणार नसल्याचं सांगितलं. शोकाकुल कुटुंबीयांप्रती त्यांनी संवेदना व्यक्त केल्या. विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह इतर मान्यवरांनीही पहलगाम हल्ल्याप्रकरणी शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

कोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात, तसंच, पुणे, पुणे घाटपरिसर, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा आणि सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशीव या भागात पुढचे दोन दिवस मेघगर्जनेसह वादळी वारे आणि पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुण्यात आज गारांचा पाऊस पडला.

//<><><><><>//